सं.क्रि.केस क्र. २७२३/२०२५
शासन -वि- साहेबराव
न्यायनिर्णय
नि.क्र. ५ लगत

MHYA050046982025

दाखल तारीख – ०९/१२/२०२५
नोंदणी तारीख – ०९/१२/२०२५
निकाल तारीख – २३/०४/२०२६
कालावधी – ००व. ०४म. १४दि.

# न्यायनिर्णय

(दिनांक २३/०४/२०२६ रोजी जाहिर केला)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई अन्वये चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाचा आणि आरोपीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुरावे यावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असुन त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणांसह नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०५/११/२०२५ रोजी मौजे शेंबाळपिंपरी, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे आरोपी त्याच्या राहत्या घरी एका प्लास्टीक डबकीत ५ लीटर गावठी हातभट्टीची दारू मुद्देमाल अवैधरीत्या बाळगतांना मिळुन आला व त्याद्वारे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई नुसार शिक्षापात्र गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ करीता

३. सरकार पक्षाने आरोपीविरूध्द सदरचा गुन्हा सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार हिम्मत गणपत कांबळे हे घटनास्थळ जप्ती पंच असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत पोलिसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. तसेच पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहित नाही असे सांगुन अभियोग पक्षास मदत केली नाही. सदर साक्षीदाराने पोलिसांनी त्यांचे समक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षाच्या उपयोगाची नाही.

४. सदर केसमध्ये सरकार पक्षाने इतर साक्षीदार यांची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे सरकार पक्ष आरोपीविरूध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आणु शकला नाही. सदर प्रकरणात रासायनिक विष्लेषणाचा अहवाल दाखल केला नसल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

५. अभिलेखावरील पुराव्यावरून असे दिसुन येते की सदर केसमध्ये साक्षीदाराने सरकार पक्षास मदत न केल्यामुळे सरकार पक्ष घटनास्थळ जप्ती पंचनाम्यावरून मजकुर सिध्द करू शकला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त झाला हे सरकार पक्ष सिध्द करू शकला नाही. याशिवाय सरकार पक्षाने जप्त दारूचा रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही आणि त्याबाबत कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही. सरकार पक्षाने आरोपीविरूध्द घटनेसंबंधी कोणताही विश्वासार्ह प्रत्यक्ष अथवा परीस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर आणला नाही.

त्यामुळे सरकार पक्ष वरील गुन्ह्यातील मजकुर संशयातीत सिध्द करू शकला नाही. त्यामुळे आरोपी हे सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. २ करीता

**६.** मुद्दे क्र. १ चे नकारार्थी निष्कर्षानुसार आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरले आहे. प्रस्तुत प्रकरणात पोलिसांनी एका प्लास्टीक डबकीत ५ लीटर गावठी हातभट्टीची दारू मुद्देमाल जप्त केला आहे. सदर दारू ही आव्हानीत कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक पुसद यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठवुन देणे न्यायोचित होईल. प्रस्तुत न्यायनिर्णयाविरूध्द आव्हान करणेकामी आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये रक्कम रूपये १५,०००/– चे बंधपत्र व जातमुचलके देण्याचे निर्देष देण्यात आले आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

# आदेश

१. आरोपी साहेबराव सोनला धबाले यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई नुसारचे गुन्ह्यामधुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.



न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

३. आरोपी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे जमानतीची पूर्तता करावी.

४. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क अधिका–यांकडे नियमाप्रमाणे नष्ट करण्याकरीता देण्यात यावा.

Digitally signed by CHONDE GAJANAN GOVINDRAO
Date: 2026.04.23 17:36:11 +0530

दिनांक – २३/०४/२०२६

**(जी. जी. चोंडे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पुसद**